संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# राजकीय हडेलहप्पीचा दुसरा अध्याय सुरू

महाराष्ट्रात पुन्हा एकदा राजकीय हडेलहप्पीपणाला सुरुवात झाली आहे. यापूर्वी हा खेळ दोन्ही काँग्रेसने मनसोक्त खेळला. आता तोच डाव राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा आणि शिवसेनेने मांडलेला आहे. नव्याने स्थापन होणाऱ्या सरकारने विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानाने मंजूर करून घेण्याचा अभूतपूर्व प्रकार महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच घडला असावा. सरकार स्थापन झाल्यानंतर त्या पक्षाकडे पूर्ण बहुमत नसेल तर त्याने राज्यपाल सांगतील त्या कालावधीत विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मंजूर करून घ्यायचा असतो. त्यातून त्या पक्षाला कोणाकोणाचा पाठिंबा आहे किंवा कोणकोणत्या पक्षाने समर्थन दिले आहे हे स्पष्ट होते. सरकार स्थापनेनंतर आपले बहुमत अजमावण्यासाठी रीतसर मतदान होणे आवश्यक ठरते. परंतु देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने पहिलाच विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानाने मंजूर करून घेणे तितकेसे योग्य ठरत नाही. घटनात्मकदृष्ट्यासुध्दा ते चुकीचे म्हणावे लागेल. म्हणजे भारतीय घटनेप्रमाणे आणि लोकशाही पध्दतीनुसार झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत मिळू शकले नाही. सर्वाधिक जागा मिळविण्याचा मान भाजपाकडे जातो यावरून जनतेचा कौल भाजपाच्या बाजूचा आहे, असा त्याचा अर्थ निघतो. मात्र लोकशाही व्यवस्थेच्या चौकटीत संख्याबळाला महत्त्व असते. विश्वासदर्शक ठरावासाठी आवश्यक असणारी किमान १४४ मते भाजपाने सभागृहात सिध्द करायला हवी होती. राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपाच्या बाजूने मतदान करण्याचा जेव्हा निर्णय घेतला, त्यावेळी या पक्षाची सर्वांत मोठी पंचाईत झाली. सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रसने मतदानात आपला पक्ष सहभागी होणार नाही, तो तटस्थ राहिल अशी भूमिका घेतली होती. त्या भरवशावर भारतीय जनता पार्टीचे नेते अवलंबून होते. जर प्रत्यक्ष मत विभागणीची मागणी झाली तर राष्ट्रवादी काँग्रेस गैरहजर राहील आणि भाजपाला आपोआप बहुमत सिध्द करता येईल, असा त्यांचा अंदाज होता. राष्ट्रवादी काँग्रेसने ऐनवेळी भूमिका बदलल्याने या पक्षापुढे आवाजी मतदानाशिवाय दुसरा पर्याय उरला नाही .या कोंडीचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न शिवसेना आणि काँग्रेसने केला. परंतु या सगळ्या प्रक्रियेत सभापतींचा निर्णय महत्त्वाचा ठरतो आणि त्यांनी आवाजी मतदानाचा पर्याय स्वीकारला. खरे तर भारतीय जनता पार्टीने योग्य ती तयारी करायला हवी होती आणि मत विभागणीतून विश्वासदर्शक ठराव मंजूर करून घ्यायला हवा होता.

## राजकीय अपरिपक्वता

भाजपाला राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा घ्यायचा नव्हता, तसा पाठिंबा घेतला असता तर भाजपाच्या सरकारला राष्ट्रवादीमुळे जीवनदान मिळाले, अशी जोरदार टीका झाली असती. परंतु राजकीय खेळी करून भाजपाने किमान ६ महिन्यांकरिता आपले सरकार स्थिर केले आहे. या कालावधीत एक तर २ डझन आमदार भाजपाला फोडावे लागतील किंवा शिवसेनेला बरोबर घेऊन राज्यकारभार करावा लागेल. आता सहा महिने देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला कोणताही धोका नाही. परंतु पुढच्या महिनाभरात म्हणजेच हिवाळी अधिवेशनापूर्वी आपल्याला लागणारा बहुमताचा जादुई आकडा भाजपाला आणावा लागेल. अन्यथा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात भाजपालाच थंडीची हुडहुडी भरण्याची शक्यता आहे. या सर्व राजकीय घडामोडींवर एक तटस्थ नजर टाकली तर विधीमंडळ परिसरात घडलेल्या घटना महाराष्ट्रातल्या अजूनही राजकीय प्रगल्भता किंवा ज्याला एक सर्वसाधारण समजूतदारपणा म्हणता येईल, तो आला नसल्याचे निदर्शक ठरते. त्यातला महत्त्वाचा भाग म्हणजे राज्यपालांना धक्काबुक्की होण्याचा प्रकार घडावा, हे एका अर्थी दुर्दैव आहे. अभिभाषणासाठी राज्यपाल येत असताना त्यांची गाडी अडवण्याचा प्रकार घडला. ते गाडीतून उतरल्यानंतरही काँग्रेसच्या अतिउत्साही आमदारांनी राज्यपालांच्या 'चले जाव'च्या घोषणा दिल्या. एवढेच नव्हे तर त्यांना धक्काबुक्कीही झाली. आता हे सर्व प्रकार कोणाच्या लोकशाही व्यवस्थेची शान वाढविणारे आहेत. महिन्यापूर्वी ज्या मतदारांनी मोठ्या विश्वासाने आपले लोकप्रतिनिधी म्हणून या लोकांना निवडून दिले आणि तेच जर अशा प्रकारची वर्तणूक करीत असतील तर त्यांच्याविषयी मतदारांच्या मनात कोणता आदरभाव शिल्लक राहील. म्हणजे सरकारच्या विश्वासदर्शक ठरावाच्या निमित्ताने आपल्याच निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींविषयी जनतेच्या मनात अविश्वास निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न याच लोकप्रतिनिधींनी केला आहे. ज्या लोकशाहीत जनतेच्या विश्वासाला तडा देण्याच्या घटना घडत आहेत. म्हणजेच राजकारणात जनतेचे हित राज्याच्या विकासाचे सामाजिक सभ्यतेचे कसे गौण किंवा कवडीमोल ठरविले जाते, त्याचे प्रदर्शन या सर्व घटनांनी दाखवून दिले आहे.

## लोकशाहीवरचा विश्वास महत्त्वाचा

राज्यपालांना धक्काबुक्की होण्याचा प्रकार आणि त्यासंबंधामध्ये काँग्रेसच्या पाच आमदारांचे निलंबन या सगळ्या गोष्टी महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणाला अशोभनीय आहेत.घटनेच्या चौकटीमध्ये अनेक गोष्टींचे महत्त्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न होत असतो. मग ते विधीमंडळाचे सार्वभौम सभागृह असेल किंवा राज्यपाल या पदाची प्रतिष्ठा असेल त्या सर्वांचा योग्य तो सन्मान राखणे लोकप्रतिनिधी या नात्याने राजकारण्यांचे कर्तव्य ठरते. केवळ सत्तेच्याभोवती पिंगा घालायचा आणि ते करत असताना लोकशाहीनेच दिलेल्या अधिकारांचा वापर करून दंगा करायचा, हे प्रकार थांबले पाहिजेत. ज्या विश्वासदर्शक ठरावाच्या निमित्ताने हा सगळा गोंधळ घातला गेला, तो पाहिल्यानंतर राजकारण्यांचाच एकमेकांवर कसा विश्वास राहिलेला नाही हे सिध्द करणारा होता. सत्तेसाठी एकत्र यायचे आणि आमचा एकमेकांवर खूप विश्वास आहे असे उगाचच वातावरण निर्माण करायचे, या गोष्टी आता जनतेच्याही लक्षात येतात. जनतेला तुमचा एकमेकांवर विश्वास आहे की नाही, यापेक्षाही तिचा लोकशाहीवर विश्वास आहे आणि ती लोकशाही टिकली पाहिजे, ती टिकवायची असेल तर लोकांनी व्यक्त केलेल्या विश्वासाला तडा जाणार नाही याची खबरदारी निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींनी आणि राजकीय पक्षांनी घेतली पाहिजे. निदान लोकशाहीच्या भल्यासाठी तरी त्यांनी ही परिपक्वता दाखवायला हवी.